# प्रेसनोट

दि. ०२/०२/२०२३

नागरी सुविधा केंद्र, निगडी, पुणे येथील डाटा एन्ट्री ऑपरेटरवर लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | निगडी पोलीस स्टेशन, पुणे येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम – ७. |
| तक्रारदार | महिला, वय - २५ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | शैलेश अकांबरी बासुतकर, वय ४१ वर्ष, पद – डाटा एन्ट्री ऑपरेटर, नेमणुक – नागरी सुविधा केंद्र, निगडी, अपर तहसील कार्यालय, पिंपरी चिंचवड अंतर्गत, पुणे. |
| मागणी केलेली लाच रक्कम | ४,०००/- रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ४,०००/- रुपये. |

पडताळणी दिनांक :- ३१/०१/२०२३, ०१/०२/२०२३ व दि. ०२/०२/२०२३.
सापळा दिनांक :- ०२/०२/२०२३.
ठिकाण :- नागरी सुविधा केंद्र, निगडी, पुणे.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांनी त्यांच्या दोन लहान बहिणींचा जातीचा दाखला मिळण्यासाठी नागरी सुविधा केंद्रामध्ये अर्ज दाखल केला होता. अर्जावर कार्यवाही करुन जातीचा दाखला देण्यासाठी डाटा एन्ट्री ऑपरेटर शैलेश बासुतकर यांनी लाच मागणी केल्याची तक्रार ला.प्र.वि. पुणे येथे दिली.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता जातीचा दाखला देण्यासाठी ऑपरेटर शैलेश बासुतकर यानी तक्रारदार यांचेकडे चार हजार रूपये लाचेची मागणी करून ती लाच रक्कम स्वीकारल्यावर त्यास ताब्यात घेण्यात आले असून निगडी पोलीस स्टेशन, पुणे येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

ला.प्र.वि. पुणे युनिटचे पोलीस निरीक्षक संदिप व-हाडे तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय अधिकारी, कर्मचारी / लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. <u>हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४</u>
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे – ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई – ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
7. ऑनलाईन ॲप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.